## प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/४५८९/२०२३ पुणे शहर, दिनांक - २७.०६.२०२३

**विषय :- बकरी ईद निमीत्त ईदगाह मैदान,गोळीबार चौक पुणे येथे करण्यात आलेल्या वाहतूक व्यवस्थेबाबत.**

-------oo--------

दिनांक २९.०६.२०२३ रोजी पुणे शहरात बकरी ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर / सार्वजनिक ठिकाणी सामूहीक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यामध्ये ईदगाह मैदान, गोळीबार चौक परिसरात मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते, सदर ठिकाणी वाहतुक सुरळीत ठेवणेकरिता तात्पुरते स्वरुपात वाहतुक वळविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे तात्पुरते स्वरुपात पर्यायी वाहतुक वळविण्याचे आदेश निर्गमित करीत आहे.

गोळीबार मैदान चौक पुणे येथील ईदगाह या ठिकाणी दिनांक २९/०६/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून नमाज पठण पुर्ण होई पर्यंत **मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान चौक ते ढोले पाटील (सेव्हन लव्हज) चौक** दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक आवश्यकते नुसार बंद करण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरील वाहन चालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.

| अ.क्र. | बंद मार्ग | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | गोळीबार चौकातून स्वारगेटकडे जाणारा मार्ग हा नमाज पठणाच्या वेळी बंद करण्यात येईल. | गोळीबार चौकातून डाव्या बाजूस वळून सीडीओ चौक पुढे उजवीकडे वळून गिरीधर भवन चौक पुढे उजवीकडे वळून सेव्हन लव्हज चौकातून इच्छित स्थळी जातील. |
| २ | सीडीओ चौक ते गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक नमाज पठण काळात सकाळी ०६.०० ते ११.०० वा. चे वेळेत पुर्णता बंद करण्यात येईल. | लुल्लानगरकडून येवून खाण्या मारुती चौकाकडे जाणारी वाहतुक खटाव बंगला चौक - नेपीयर रोड-मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा वानवडी बाजार चौक - भैरोबानाला येथुन किंवा गिरीधर भवन चौकातून इच्छित स्थळी जातील. |
| ३ | सेव्हन लव्हज चौका कडून गोळीबार मैदानकडे येणारी वाहतुक बंद करण्यात येईल. | सॅलसबरी पार्क - सीडीओ चौक - भैरोबानाला येथून इच्छित स्थळी जातील. |
| ४ | सोलापूर रोडने मम्मादेवी चौकातुन गोळीबार चौकाकडे जाणारा मार्ग बंद करण्यात येईल. | मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा जुने कमांड हॉस्पीटल मार्गे इच्छितस्थळी जातील. |
| ५ | भैरोबानाला ते गोळीबारकडे जाणारी वाहतुक भैरोबानाला येथे बंद करुन एम्प्रेस गार्डन व लुल्लानगरकडे वळविण्यात येईल. | प्रिन्स ऑफ वेल रोडने (एम्प्रेस गार्डन रोड) किंवा भैरोबानाला-वानवडी बाजार- लुल्लानगर येथून इच्छित स्थळी जातील. |
| ६ | कोंढवा परीसरातून गोळीबार कडे येणा-या सर्व जड माल वाहतुक वाहने, प्रवासी वाहतुक करणारी जड वाहने, एसटी बसेस, पीएमपीएमएल बसेस यांनी यांना मनाई करण्यात येत आहे. | सदर वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करून लुल्लानगर चौकातून भैरोबानाला चौकामार्गे किंवा गंगाधाम चौकातून इच्छित स्थळी जातील. |

याखेरीज शहरातील अन्य भागातील ठिकाणचे ईदगाह मैदानावर नमाज पठण होत असते, सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.

**(विजयकुमार मगर)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

प्रत :- सर्व संबधितांना.

**<u>कार्यालयीन टिपण्णी</u>**

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक यांचे कार्यालय, पुणे शहर.

**<u>विषय</u> :- बकरी ईद निमित्त ईदगाह मैदान, गोळीबार चौक पुणे येथे करण्यात आलेल्या वाहतुक व्यवस्थेबाबत.**

-------oo--------

दिनांक २९.०६.२०२३ रोजी पुणे शहरात बकरी ईद साजरी होणार आहे. त्या निमीत्त मुस्लीम बांधव एकत्र येऊन आप-आपल्या मोहल्यातील मशिद व ईदगाह मैदानावर / सार्वजनिक ठिकाणी सामूहीक नमाज पठण करून ईद साजरी करतात. त्यामध्ये ईदगाह मैदान, गोळीबार चौका जवळ मोठया प्रमाणावर वाहनांची गर्दी होते, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२, दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

गोळीबार मैदान चौक पुणे येथील ईदगाह या ठिकाणी दिनांक २९/०६/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून नमाज पठण पुर्ण होई पर्यंत **मम्मादेवी चौक ते गोळीबार मैदान चौक ते ढोले पाटील (सेव्हन लव्हज) चौक** दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक आवश्यकते नुसार बंद करण्यात येणार आहे. नमूद रस्त्यावरील वाहन चालकांनी खालील प्रमाणे पर्यायी मार्गाचा येणे-जाणेसाठी वापर करावा.

| अ.क्र. | **बंद मार्ग** | **पर्यायी मार्ग** |
|---|---|---|
| १ | गोळीबार चौकातून स्वारगेटकडे जाणारा मार्ग हा नमाज पठणाच्या वेळी बंद करण्यात येईल. | गोळीबार चौकातून डाव्या बाजूस वळून सीडीओ चौक पुढे उजवीकडे वळून गिरीधर भवन चौक पुढे उजवीकडे वळून सेव्हन लव्हज चौकातून इच्छित स्थळी जातील. |
| २ | सीडीओ चौक ते गोळीबार चौकाकडे येणारी वाहतुक नमाज पठण काळात सकाळी ०६.०० ते ११.०० वा. चे वेळेत पुर्णता बंद करण्यात येईल. | लुल्लानगरकडून येवून खाण्या मारुती चौकाकडे जाणारी वाहतुक खटाव बंगला चौक - नेपीयर रोड- मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा वानवडी बाजार चौक - भैरोबानाला येथुन किंवा गिरीधर भवन चौकातून इच्छित स्थळी जातील. |
| ३ | सेव्हन लव्हज चौका कडून गोळीबार मैदानकडे येणारी वाहतुक बंद करण्यात येईल. | सॅल्सबरी पार्क - सीडीओ चौक - भैरोबानाला येथून इच्छित स्थळी जातील. |
| ४ | सोलापूर रोडने मम्मादेवी चौकातुन गोळीबार चौकाकडे जाणारा मार्ग बंद करण्यात येईल. | मम्मादेवी चौक बिशप स्कुल मार्गे किंवा जुने कमांड हॉस्पीटल मार्गे इच्छितस्थळी जातील. |
| ५ | भैरोबानाला ते गोळीबारकडे जाणारी वाहतुक भैरोबानाला येथे बंद करुन एम्प्रेस गार्डन व लुल्लानगरकडे वळविण्यात येईल. | प्रिन्स ऑफ वेल रोडने (एम्प्रेस गार्डन रोड) किंवा भैरोबानाला-वानवडी बाजार- लुल्लानगर येथून इच्छित स्थळी जातील. |
| ६ | कोंढवा परीसरातून गोळीबार कडे येणा-या सर्व जड माल वाहतुक वाहने, प्रवासी वाहतुक करणारी जड वाहने, एसटी बसेस, पीएमपीएमएल बसेस यांनी यांना मनाई करण्यात येत आहे. | सदर वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करून लुल्लानगर चौकातून भैरोबानाला चौकामार्गे किंवा गंगाधाम चौकातून इच्छित स्थळी जातील. |

याखेरीज शहरातील अन्य भागातील ठिकाणचे ईदगाह मैदानावर नमाज पठण होत असते, सदर भागातील वाहतूकीचे परिस्थितीनुसार तेथील वाहतूक बंद अथवा अन्य मार्गाने वळविण्यात येईल, तरी वाहन चालकांनी पोलीसांना सहकार्य करून संभाव्य गैरसोय टाळावी.

सविनय सादर.

**( ए. जी. बोत्रे )**
पोलीस निरीक्षक, प्रशासन
वाहतूक शाखा, पुणे शहर.

**१. मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतूक, पुणे शहर /-**

**२. मा. पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर /-**